**महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अनुदान वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः- राअआ-२०२६/प्र.क्र.५६/का-९**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: १५ जून, २०२६

**संदर्भ :-**

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९ एप्रिल, २०२६.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांचे क्र.राअआ/लेखा/प्र.क्र.०१/का-०४/ २०२६-२७, दि.२८.०४.२०२६ रोजीचे पत्र व त्यासोबतची सहपत्रे.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष “२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)” करिता रु.४१.७५ लाख इतकी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. सदर तरतुदीपैकी वित्त विभागाकडून **रु.१६.०० लाख** इतका निधी बीम्स प्रणालीवर वितरणाकरिता प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिला आहे. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी मागणी केल्यानुसार, ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षाखाली बीम्स प्रणालीवरील उपलब्ध निधीमधून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयास कार्यालयीन खर्च भागविण्याकरीता अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष “२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षांतर्गत रु.४१.७५ लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

२. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई या कार्यालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता अनुदान मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षाखालील बीम्स प्रणालीवरील उपलब्ध निधीमधून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास कार्यालयीन खर्चाकरिता **रु.१६.०० लाख** इतका निधी मंजूर करुन वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर तरतूद सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. याकरिता, अवर सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तर सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील. महाराष्ट्र राज्य

अल्पसंख्याक आयोगाने सन २०२६-२७ च्या मासिक निधी विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे आयोगाच्या कार्यालयाचा खर्च विहित मर्यादेत राहील याची दक्षता घेण्यात यावी. आयोगाने कोणत्याही प्रकारची खरेदी वा दुरुस्ती करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे. तसेच ज्या उद्दीष्टाकरिता निधी वितरीत करण्यात आले आहे केवळ त्याकरिताच खर्च करण्यात यावे. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीतून केलेल्या खर्चाचा तपशील, उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certification) शासनास वेळोवेळी सादर करणे बंधनकारक आहे. संदर्भ क्र.(१) मधील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये विहीत अटी व तरतुदींचे काटेकोरपणे पालन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई यांनी करावे.

५. उपरोक्त बाबीवरील खर्च "मागणी क्र. झेडई -१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाज कल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (१६) राज्य अल्पसंख्याक आयोग २२३५ ए २४९ (अनिवार्य), ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय "वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या-त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं- २०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९ एप्रिल, २०२६ मधील अटींची तसेच सोबतच्या परिशिष्टामधील सर्व बाबींची पुर्तता करण्याच्या अटीस अनुसरुन तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७९/२०२६/व्यय १, दिनांक ०६.०६.२०२६ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे."

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०६१५१२१११३८४१४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DEEPAK SURESH LOKARE

Digitally signed by DEEPAK SURESH LOKARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Minority Development Dept, 2.5.4.20=84FA0E4161C384FE5BB199680D742B01B9FF5E70EB03ACC5CF869939DF38FC7C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=96E09CC75F3C5CE534452384ACDEA2D6DE10039C9E34EAD32DBA3AC3466055D1, cn=DEEPAK SURESH LOKARE
Date: 2026.06.15 12:12:06 +05'30'

**( दिपक सु. लोकरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
२. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
५. कक्ष अधिकारी ( व्यय-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
६. कक्ष अधिकारी, (का-७) , अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
७. निवडनस्ती (कार्यासन-९).